महाराष्ट्र शासन

विधि व न्याय विभाग

## सन १८८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १

# महाराष्ट्र ग्राम स्वच्छता अधिनियम.

(३० जुलै, २०१३ पर्यंत सुधारित)

## Maharashtra Act No. I of 1889

# The Maharashtra Village Sanitation Act.

*(As modified upto 30th July, 2013)*

*

व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार, कोल्हापूर यांच्याकडून भारतात मुद्रित आणि
संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई-४०० ००४ यांच्याकडून प्रकाशित.

2013

[किंमत : रु. १३.००]

# महाराष्ट्र ग्राम स्वच्छता अधिनियम

## अनुक्रमणिका

## भाग एक

### प्रारंभिक

**कलमे.**

पृष्ठे


| | | |
|---|---|---|
| १. | संक्षिप्त नाव. .. .. .. | १ |
| २. | व्याप्ती. .. .. .. | १ |
| ३. | अधिनियमितीचे निरसन. .. .. .. | २ |
| ४. | व्याख्या. .. .. .. | २ |
| ५. | भाग दोन, तीन व चार यांचे प्रवर्तन. .. .. .. | २ |
| ६. | भाग दोन हा एखाद्या गावास कसा लागू करावा. .. .. .. | २ |
| ७. | भाग तीन हा एखाद्या गावास कसा लागू करावा. .. .. .. | ३ |


## भाग दोन

### स्वच्छता समित्या


| | | |
|---|---|---|
| ८. | प्रत्येक गावात स्वच्छता समिती असणे. .. .. .. | ४ |
| ९. | समितीच्या कामकाजाचा अभिलेख. .. .. .. | ४ |
| १०. | गावात अधिकारिता असलेल्या दंडाधिकाऱ्यांना समितीच्या कामकाजात भाग घेता येईल. .. | ४ |
| ११. | स्वच्छता समितीने गावाच्या संबंधात नियम करणे. .. .. .. | ५ |
| १२. | नियम करण्यासंबंधीच्या तरतुदी. .. .. .. | ५ |
| १३. | नियमाविरुध्द अपराध करणाऱ्यावर खटला चालविणे. .. .. .. | ६ |
| १४. | नियमाविरुध्द झालेल्या अपराधांची समितीने दखल घेणे. .. .. .. | ६ |
| १५. | समितीच्या निकालाविरुध्द अपिले. .. .. .. | ६ |
| १६. | स्वच्छता समितीला आवश्यक कामांचा किंवा उपाययोजनांचा खर्च प्राधिकृत करता येईल... | ७ |
| १७. | स्वच्छता समितीस खुल्या जागेतील विक्री केंद्रांवर पट्टी बसवता येईल. .. .. | ७ |
| १८. | खर्चाकरिता आवश्यक असलेला पैसा, स्वेच्छा वर्गणीद्वारे किंवा रहिवाशांवर पट्टी बसवून उभारता येईल. .. | ७ |
| १८-अ. | स्वच्छता समितीने प्राप्तीचे व खर्चाचे वार्षिक विवरण तयार करणे. .. | ८ |

**अनुक्रमणिका--**चालू

## भाग तीन

### स्वच्छता मंडळे


| | | पृष्ठे |
|---|---|---|
| १९. | स्वच्छता मंडळांची रचना. .. .. .. | ८ |
| २०. | स्वच्छता मंडळास नियम करता येतील. .. .. .. | ९ |
| २१. | स्वच्छता निरीक्षक व इतर अधिकारी यांची नेमणूक. .. .. .. | ९ |
| २२. | स्वच्छता निरीक्षकाची कर्तव्ये. .. .. .. | ९ |
| २३. | नियमभंग केल्याबद्दल मंडळाने आपण होऊन खटला भरणे. .. .. | १० |
| २४. | नियमांविरुध्द झालेल्या अपराधांची मंडळाने दखल घेणे. .. .. .. | १० |
| २५. | स्वच्छता मंडळाचे आदेश कोणी अंमलात आणावेत. .. .. .. | १० |
| २६. | [निरसित.] .. .. .. | १० |
| २७. | स्वच्छता मंडळास ज्यांची तरतूद करता येईल अशी कामे व इमारती. .. .. | ११ |
| २८. | स्वच्छता मंडळास स्वेच्छा वर्गणीद्वारे पैसा उभारता येईल. .. .. .. | ११ |
| २९. | कोणत्या प्रयोजनासाठी स्वच्छता मंडळाने खर्च केला पाहिजे. .. .. .. | ११ |
| ३०. | स्वच्छता मंडळाचे अर्थोपाय. .. .. .. | ११ |


## भाग चार

### सर्वसाधारण तरतुदी


| | | |
|---|---|---|
| ३०-अ. | स्वच्छता समित्या व स्वच्छता मंडळे कायद्याने संस्थापित करणे. .. .. | १२ |
| ३०-ब. | मालमत्ता संपादन करण्याचा, धारण करण्याचा व हस्तांतरित करण्याचा अधिकार स्वच्छता समिती किंवा स्वच्छता मंडळ यांच्यामध्ये निहित असलेली मालमत्ता. .. | १२ |
| ३०-क. | संविदा करण्याची पध्दती. .. .. | १३ |
| ३०-ड. | स्वच्छता समिती किंवा स्वच्छता मंडळ यांचा निधी. .. .. | १३ |
| ३०-इ. | स्वच्छता समिती किंवा स्वच्छता मंडळ यांची मालमत्ता व निधी यांचे उपयोजन कसे करावे. .. .. | १४ |
| ३०-फ. | अधिशेष निधी ठेव म्हणून ठेवण्याचा व व्याजी लावण्याचा अधिकार. .. .. | १४ |
| ३०-ग. | स्वच्छता समिती किंवा स्वच्छता मंडळ अस्तित्वात असण्याचे बंद झाल्यास किंवा तिची/त्याची अधिकारिता बंद झाल्यास तिची/त्याची मालमत्ता व हक्क यांचे निहितीकरण. .. .. | १४ |
| ३१. | शासनाच्या विवक्षित अधिकाऱ्यांनी स्वच्छता समित्यांना व मंडळांना सल्ला देणे. .. | १५ |
| ३२. | स्वच्छता समित्या व मंडळे यांच्या सदस्य, इत्यादींना अधिकारपदावरून काढून टाकणे. .. | १५ |

**अनुक्रमणिका--**समाप्त


| | | पृष्ठे |
|---|---|---|
| ३३. | रिकाम्या झालेल्या जागा भरणे. .. .. .. | १५ |
| ३४. | प्रश्नांचा निर्णय बहुमताने करणे. .. .. .. | १६ |
| ३५. | समन्से, इ. वर सही करणे. .. .. .. | १६ |
| ३६. | या अधिनियमान्वये केलेल्या नियमांचा भंग केल्याबद्दल शिक्षा. .. .. | १६ |
| ३७. | दंड वसूल करण्याबद्दलचा आदेश. .. .. | १६ |
| ३८. | दंड व पट्ट्या वसूल करणे. .. .. .. | १६ |
| ३९. | [निरसित.] .. .. .. | १६ |
| ४०. | स्थानिक मंडळाकडून अंशदाने व कर्जे. .. .. .. | १६ |
| ४१. | ज्यामध्ये दोन किंवा अधिक स्वच्छता समित्या किंवा मंडळे संयुक्तरीत्या हितसंबंधित असतील अशी कामे पार पाडणे अशा कामांच्या परिव्ययाची वसुली. .. | १७ |
| | स्वच्छता समितीने किंवा मंडळाने योजलेले काम तिने / त्याने, स्थानिक मंडळ हाती घेणार असलेल्या कामाखातर सोडून देणे. .. | १८ |
| | अशा प्रकरणांत स्थानिक मंडळांना माहिती मागविता येईल. | |
| ४२. | विवक्षित गावनोकर स्वच्छता समितीच्या किंवा मंडळाच्या आधिपत्याखाली देणे. .. | १८ |
| ४३. | स्वच्छता समिती किंवा मंडळ यांच्या आधिपत्याखाली ठेवलेल्या गावनोकरांना द्यावयाची रक्कम निर्धारित करणे व ती वसूल करणे. .. | १८ |
| ४४. | जिल्हाधिकाऱ्यांचे या अधिनियमाखालील कार्याधिकार प्रत्यायोजित करता येतील. .. | १९ |
| ४५. | जिल्हाधिकारी, दंडाधिकारी व इतर लोकसेवक हे आपला प्राधिकार वापरताना परिपाठी नियंत्रणाच्या अधीन असतील. .. | १९ |
| ४६. | या अधिनियमान्वये सद्भावपूर्वक काम करणाऱ्या व्यक्तींचे दायित्व निराकरण. .. | १९ |
| **परिशिष्ट.** | .. .. .. | २० |


-------------

# सन १८८९ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक १ [१]

**(महाराष्ट्र ग्राम स्वच्छता अधिनियम)**

[२३ मे १८९०]

या अधिनियमात पुढील आदेश व अधिनियम याअन्वये अनुकूलन, फेरबदल, सुधारणा व अंशतः निरसन करण्यात आले आहे :--

सन १९१५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३.

सन १९३१ चा मुंबई अधिनियम क्रमांक २५.

भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेश.

सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५३.

सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ८.

विधि अनुकूलन आदेश, १९५०.

सन १९५१ चा मुंबई अधिनियम क्रमांक २३.

सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक २२.

मुंबई विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९५६.

महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६०.

सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ (२२.८.२०१२)

**ज्याअर्थी,** महाराष्ट्र इलाख्यातील ग्राम स्वच्छताविषयक स्थिती सुधारण्याच्या प्रयोजनासाठी, अशा गावांवर प्राधिकार असणाऱ्या स्वच्छता समित्या व मंडळे यांची रचना करण्याची तरतूद करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :--

## भाग एक

### प्रारंभिक

**१. या** अधिनियमास [२] [महाराष्ट्र ग्राम स्वच्छता अधिनियम], असे म्हणावे. संक्षिप्त नाव.

१८७४ चा १४. **२. तो** [३] [महाराष्ट्र राज्याच्या मुंबई क्षेत्रास], [४] [बृहन्मुंबईस], [५] [ * * * * ] व [६] अनुसूचित जिल्हा अधिनियम, १८७४ मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे असलेल्या [७] मेहवासी प्रमुखांच्या गावांच्या [८] अनुसूचित जिल्ह्यांस लागू आहे. व्याप्ती.

---

१ उद्देश व कारणे यांच्या निवेदनासाठी मुंबई सरकार राजपत्र १८८९, भाग पाच, पृ. ९ (इंग्रजी) पहा. प्रवर समितीच्या अहवालासाठी वरील राजपत्राचे पृ. ३४ पहा ; आणि परिषदेतील कामकाजवृत्तासाठी वरील राजपत्राची पृ. १२ व ४६ पहा.

२ सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४, अनुसूचीद्वारे अधिनियमाच्या नावात बदल करण्यात आला.

३ महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६०, अनुसूची अन्वये "बदली करण्यात आलेले प्रदेश खेरीज करून उर्वरित राज्य पुनर्रचनेच्या मुंबई राज्यास" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

४ सन १९५० चा मुंबई अधिनियम, क्रमांक ८, कलम ५ व ११ अन्वये मूळ शब्दांऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

५ भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशाद्वारे "एडन व त्याचे आश्रित प्रदेश, पेरीम" हा मजकूर वगळण्यात आला.

६ केंद्रीय अधिनियम.

७ सन १९४९ चा मुंबई विनियम क्रमांक १ अन्वये हा अधिनियम मेहवासी प्रमुखांच्या गावांना लागू करण्यात आला.

८ मेहवासी प्रमुखांच्या मालकीची गावे पुढीलप्रमाणे आहेत :-- १) काथीचे पारवी २) नालचे पारवी ३) सिंगपूरचे पारवी ४) गौहालीचे वालवी ५) चिखलीचे वासावा ६) नवलपूरचे पारवी.

अधिनियमितीचे निरसन.

**३.** कोणत्याही गावात भाग दोन व भाग तीन व त्याअन्वये केलेले नियम अंमलात असतील तोपर्यंत अनुसूचित नमूद केलेले अधिनियम, हे अनुसूचिच्या तिसऱ्या स्तंभात विनिर्दिष्ट केले आहे तेथपर्यंत, उक्त गावात प्रवर्तनात असण्याचे बंद होईल.

व्याख्या.

**४.** विषयात किंवा संदर्भात एतद्विरुध्द काही नसल्यास, या अधिनियमात,—

(अ) "गाव" म्हणजे मुंबई जमीन महसूल संहिता, १८७९, कलम १२६ अन्वये त्या त्या वेळी निर्धारित केलेले गावाचे अथवा शहराचे ठिकाण व त्यासह अशा ठिकाणाच्या कोणत्याही भागापासून $^{१}/_{४}$ मैल अंतराच्या आतील क्षेत्र ही जेथवर एखाद्या कायम नगरपालिका जिल्ह्यात अथवा लष्करी कटकात समाविष्ट केली नसतील, तेथवर ते ठिकाण व ते क्षेत्र ; १८७९ चा मुंबई ५.

(ब) "विहित केलेले" म्हणजे या अधिनियमान्वये केलेल्या नियमाद्वारे विहित केलेले ;

(क) "चावडी" म्हणजे ज्या कोणत्याही गावात चावडी नसेल त्या गावात जिल्हाधिकारी निदेशित करील अशी जागा या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी चावडी असल्याचे मानण्यात येईल.

भाग दोन, तीन व चार यांचे प्रवर्तन.

**५.** (१) भाग दोन हा, जिल्हाधिकाऱ्यास याबाबतीत यात यापुढे प्रदान केलेल्या अधिकारान्वये, तो ज्या कोणत्याही गावास लागू करील, त्या गावात जिल्हाधिकारी निदेश देईल त्या तारखेपासून अंमलात येईल, आणि याप्रमाणे तो लागू करण्यात आला असता तो [१][आयुक्त] [२][**शासकीय राजपत्रातील**] अधिसूचनेद्वारे, अशा गावात तो प्रवर्तनात असण्याचे बंद झाले आहे असे निदेशित करीतोपर्यंत किंवा अशा गावांना भाग तीन लागू करीतोपर्यंत अंमलात असण्याचे चालू राहील.

(२) भाग तीन हा, [१][आयुक्तास] याबाबतीत यात यापुढे प्रदान केलेल्या अधिकारान्वये, तो ज्या कोणत्याही गावास लागू करील, त्या गावात, [१][आयुक्त] याबाबतीत निदेशित करील त्या तारखेपासून अंमलात येईल आणि याप्रमाणे तो लागू करण्यात आला असता तो, [१][आयुक्त], [२][**शासकीय राजपत्रातील**] अधिसूचनेद्वारे अशा गावात तो प्रवर्तनात असण्याचे बंद झाले आहे असे निदेशित करीतोपर्यंत अंमलात असण्याचे चालू राहील.

(३) भाग चार हा, त्याच्या तरतुदी एकतर भाग दोन किंवा भाग तीन ज्या गावात अंमलात असेल अशा प्रत्येक गावात व त्या गावाच्या संबंधात जेथवर लागू असतील तेथवर अंमलात असेल.

भाग दोन हा एखाद्या गावास कसा लागू करावा.

**६.** (१) [१][आयुक्त] आणि [३][ [४][राज्य] शासन] यांच्या नियंत्रणाच्या अधीनतेने जिल्हाधिकाऱ्यास कोणत्याही वेळी, त्याच्या जिल्ह्यातील ज्या गावात भाग तीन अंमलात नसेल, त्या गावास, भाग दोन लागू करता येईल.

(२) कोणत्याही गावास भाग दोन हा लागू करण्याच्या प्रयोजनासाठी, जिल्हाधिकारी, जिल्ह्याच्या भाषेत एक उद्‌घोषणा, आपल्या स्वतःच्या कार्यालयात व उक्त गाव ज्या तालुक्यात किंवा महालात असेल त्या तालुक्याच्या मामलेदाराच्या किंवा त्या महालाच्या महालकऱ्याच्या कार्यालयात व उक्त गावातील चावडीत अगर इतर कोणत्यातरी सार्वजनिक इमारतींत ठळक जागी त्यांच्या प्रती लावून प्रसिध्द करण्याची तजवीज करील व त्यात असे निदेशित करील की आपणाकडून त्यानंतर विरुध्द अर्थाची दुसरी उद्‌घोषणा काढण्यात आल्याखेरीज, भाग दोन हा, ती

१ मुंबई विकेंद्रीकरण अधिनियम, १९१५ (१९१५ चा मुंबई ३) अन्वये "गव्हर्नर इन कौन्सिल" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

२ भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशान्वये, "मुंबई सरकार राजपत्र" या शब्दांऐवजी "शासकीय राजपत्र" हे शब्द दाखल करण्यात आले.

३ वरील आदेशान्वये, "सरकार" या शब्दाऐवजी "प्रांतिक सरकार" हे शब्द दाखल करण्यात आले.

४ विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये 'प्रांतिक' या शब्दाऐवजी 'राज्य' हा शब्द दाखल करण्यात आला.

उद्‌घोषणा उक्त गावात लावल्याच्या तारखेपासून दोन महिन्याच्या आतील नसणाऱ्या, त्या उद्‌घोषणेत विनिर्दिष्ट करावयाच्या तारखेस किंवा तारखेपासून त्या गावास लागू होईल. तसेच तो भाग लागू करण्याच्या संबंधाने त्या गावातील कोणताही रहिवासी जो कोणताही आक्षेप घेऊ इच्छील, तो, उक्त विनिर्दिष्ट तारखेपूर्वी एक महिन्याहून उशिरा नाही अशा अवधीत जिल्हाधिकाऱ्याकडे सादर केला असता तो दाखल करून घेऊन त्याचा विचार करण्यात येईल असेही त्या उद्‌घोषणेत नमूद करण्यात येईल.

(३) वर सांगितल्याप्रमाणे जे कोणतेही आक्षेप घेण्यात आले असतील त्यांचा विचार केल्यानंतर उक्त गावास भाग दोन हा लागू न करण्यास किंवा त्यास तो लागलीच लागू न करण्यास एखादे सुयोग्य कारण आहे असे जिल्हाधिकाऱ्याचे मत असेल तर, त्यास, वर सांगितल्याप्रमाणे उद्‌घोषणा प्रसिध्द करून--

(अ) आपली पूर्वीची उद्‌घोषणा रद्द करता येईल; अथवा

(ब) उक्त गावास भाग दोन विनिर्दिष्ट कालावधीकरिता लागू करण्याचे निलंबित करता येईल.

(४) एखाद्या गावास भाग दोन विनिर्दिष्ट कालावधीकरिता लागू करण्याचे जिल्हाधिकारी निलंबित करील तर त्यास, त्यानंतर वर सांगितल्याप्रमाणे उद्‌घोषणा प्रसिध्द करून––

(क) हा भाग लागू करण्याचा प्रस्ताव कोणत्याही वेळी सोडून देता येईल ; किंवा

(ड) हा भाग लागू करण्याचे वेळोवेळी पुढील विनिर्दिष्ट कालावधीपर्यंत लांबणीवर टाकता येईल.

भाग तीन हा एखाद्या गावास कसा लागू करावा.

**७.** (१) [१][आयुक्तास] [२][क्षेत्राच्या] ज्या कोणत्याही भागात हा अधिनियम लागू असेल त्या भागातील कोणत्याही गावास कोणत्याही वेळी भाग तीन लागू करता येईल, मग त्या वेळी त्या गावात भाग दोन अंमलात असो अगर नसो. भाग दोन अंमलात असलेल्या गावास याप्रमाणे भाग तीन लागू केल्यामुळे त्या गावास भाग दोन लागू असण्याचे बंद होईल.

(२) अशा कोणत्याही गावास भाग तीन लागू करण्याच्या प्रयोजनासाठी [१][आयुक्त], [३][**शासकीय राजपत्रातील**] [४][अधिसूचनेद्वारे], असा निदेश देईल की, त्यानंतर आपणाकडून विरुध्द अर्थाची अधिसूचना काढण्यात आल्याखेरीज भाग तीन हा, अधिसूचनेत विनिर्दिष्ट करावयाच्या तारखेस व तारखेपासून त्या गावास लागू होईल ; अशी तारीख उद्‌घोषणेच्या तारखेपासून तीन महिन्याच्या आतील असणार नाही आणि तो भाग लागू करण्याच्या संबंधाने त्या गावातील कोणताही रहिवासी जो कोणताही आक्षेप घेऊ इंच्छिल तो, उक्त विनिर्दिष्ट केलेल्या तारखेपूर्वी एक महिन्याहून उशिरा असणार नाही अशा अवधीत [५][आयुक्ताकडे] किंवा जिल्हाधिकाऱ्याकडे सादर करण्यात आला तर तो दाखल करून घेऊन त्याचा विचार करण्यात येईल, असेही त्या अधिसूचनेत नमूद करण्यात येईल.

---

१ मुंबई विकेंद्रीकरण अधिनियम, १९१५ (१९१५ चा मुंबई ३) अन्वये "गव्हर्नर इन कौन्सिल" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

२ मुंबई विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९५६ अन्वये "इलाख्याच्या" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

३ भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशान्वये, "मुंबई सरकार राजपत्र" याऐवजी "शासकीय राजपत्र" हे शब्द दाखल करण्यात आले.

४ अधिनियमाचा भाग तीन काही गावांना व तालुक्यांना लागू करण्याबाबतच्या अधिसूचनेसाठी मुंबई स्थानिक नियम व आदेश पहा.

५ मुंबई विकेंद्रीकरण अधिनियम, १९१५ (१९१५ चा मुंबई ३) अन्वये "सरकारचे सचिव" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

(३) वर सांगितल्याप्रमाणे, जे कोणतेही आक्षेप दाखल करून घेण्यात आले असतील त्यांचा विचार केल्यानंतर उक्त गावास भाग तीन लागू न करण्यास किंवा त्यास तो लागलीच लागू न करण्यास एखादे सुयोग्य कारण आहे असे [१] [आयुक्ताचे] मत असेल तर त्यास [२] [**शासकीय राजपत्रातील**] अधिसूचनेद्वारे, कलम ६, पोटकलम (३) व (४) याअन्वये भाग दोनच्या संबंधात जे अधिकार वापरण्यास जिल्हाधिकाऱ्याला प्राधिकृत केलेले असेल, तसेच अधिकार उक्त भाग लागू करण्याच्या संबंधात वापरता येतील.

(४) [१] [आयुक्ताने] या कलमान्वये काढलेल्या प्रत्येक अधिसूचनेचा जिल्ह्याच्या भाषेतील अनुवाद, जिल्हाधिकारी, त्याने स्वतः काढलेली उद्‌घोषणा प्रसिध्द करण्याबाबत कलम ६, पोटकलम (२) अन्वये विहित केलेल्या रीतीने विनाविलंब प्रसिध्द करील.

## भाग दोन

### स्वच्छता समित्या

प्रत्येक गावात स्वच्छता समिती असणे.

**८.** (१) हा भाग लागू केलेल्या प्रत्येक गावात एक स्वच्छता समिती असेल. कोणत्याही विशिष्ट प्रकरणी जिल्हाधिकाऱ्याने लेखी कारणे नमूद करून, अन्यथा निर्धारित केले नसेल तर उक्त समितीत त्या गावाच्या रहिवासी असलेल्या तीन किंवा अधिक घरदारवाल्या प्रौढ व्यक्ती असतील व जिल्हाधिकाऱ्याने त्यांची निवड त्यांच्या स्वतःच्या संमतीने केलेली असेल ; पोलीस पाटील हा त्यांच्यापैकी एक असेल. याप्रमाणे निवड करण्याच्या कामी आपणास मदत व्हावी म्हणून जिल्हाधिकाऱ्यास स्वविवेकानुसार त्यास इष्ट वाटेल त्या पध्दतीने गावातील घरदारवाल्या व्यक्तींकडून अर्ह व्यक्तींचे नामनिर्देशन किंवा निवडणूक करून घेता येईल.

(२) उक्त समितीचा सभापती हा, जिल्हाधिकाऱ्याने नामनिर्दिष्ट केलेला असेल.

(३) समितीचा सभापती व इतर सदस्य विहित कालावधीकरिता अधिकारपद धारण करतील.

समितीच्या कामकाजाचा अभिलेख.

**९.** स्वच्छता समितीच्या कामकाजाची नोंद ग्रामलेखापाल अगर त्याबाबतीत जिल्हाधिकारी नेमील अशी इतर व्यक्ती व ग्रामलेखापाल किंवा याप्रमाणे नेमलेली व्यक्ती गैरहजर असेल त्यावेळी समिती त्या प्रयोजनासाठी ज्या इतर व्यक्तीला नेमील ती व्यक्ती, विहित रीतीने (किंवा कलम ११ अन्वये नियम करण्यात येईतोपर्यंत, जिल्हाधिकारी लेखी आदेशाद्वारे निदेश देईल त्या रीतीने) करील ; व सभापती अगर त्या बाबतीत समितीने प्राधिकृत केलेला तिचा इतर कोणताही सदस्य उक्त अभिलेख प्रत्येक दिवसाच्या कामकाजाच्या नोंदीच्या शेवटी सहीनिशी सत्यापित करील.

गावात अधिकारिता असलेल्या दंडाधिकाऱ्यांना समितीच्या कामकाजात भाग घेता येईल.

**१०.** गावात अधिकारिता असलेल्या प्रत्येक दंडाधिकाऱ्यास समितीच्या ज्या कोणत्याही सभेत तो हजर असेल त्या सभेतील समितीच्या कामकाजात भाग घेता येईल आणि अशा दंडाधिकाऱ्यास किंवा त्या प्रयोजनार्थ असे एकाहून अधिक दंडाधिकारी असल्यास, त्यांच्यापैकी ज्येष्ठतम दंडाधिकाऱ्यास त्या प्रसंगापुरता समितीचा सदस्य व अध्यक्ष मानण्यात येईल.

---

१ मुंबई विकेंद्रीकरण अधिनियम, १९१५ (१९१५ चा मुंबई ३) अन्वये "सरकार" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

२ भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशान्वये, "मुंबई सरकार राजपत्र" याऐवजी "शासकीय राजपत्र" हे शब्द दाखल करण्यात आले.

**११.** स्वच्छता समितीस, पुढील गोष्टीबाबत नियम करता येतील व ते, जिल्हाधिकाऱ्याच्या मान्यतेने निरसित करता येतील किंवा त्यात फेरफार करता येतील :-- स्वच्छता समितीने गावाच्या संबंधात नियम करणे.

(अ) आपल्या सदस्यांच्या पदावधीचे व आपल्या कामकाजाचे विनियमन करणे ;

(ब) आपल्या कामकाजाची नोंद ज्या रीतीने ठेवण्यात येईल ती रीत ठरविणे ;

(क) गावाच्या उपयोगासाठी पिण्याच्या स्वच्छ पाण्याचा पुरेसा पुरवठा प्राप्त करून घेणे व त्याचे परिरक्षण करणे ;

(ड) गावातील सडका व खुल्या जागा यांची साफसफाई करणे ;

(इ) गावात घृणास्पद व अपायकारक पदार्थ साचू न देणे ;

[१] [(इअ) गावातील परिवास्तूंना धातूच्या पट्ट्यांच्या सहाय्याने क्रमांक किंवा पोटक्रमांक देणे, ते सुस्थितीत ठेवणे व अशारितीने क्रमांक देण्याच्या किंवा नव्याने क्रमांक देण्याच्या संबंधातील खर्च परिवास्तूंच्या मालकांकडून वसूल करणे.

**स्पष्टीकरण** : या खंडाच्या प्रयोजनांकरिता "परिवास्तू" म्हणजे घर, उप-घर, तबेला, छपरी, खोपटे किंवा इतर संरचना, मग ती चिरेबंदी, विटांची, लाकडाची, मातीची, धातूची किंवा, इतर कोणत्याही सामग्रीची असो; तसेच ती माणसांना राहण्यासाठी वापरलेली असो किंवा इतर कारणासाठी असो.] ;

(फ) गावात उपद्रव व असभ्य किंवा अनारोग्यकारी कृत्ये होण्यास प्रतिबंध करणे ; आणि

(ग) सामान्यतः गावामध्ये या अधिनियमाची प्रयोजने अंमलात आणणे.

**१२.** (१) कलम ११ अन्वये जो कोणताही नियम करावयाचे योजिले असेल तो अंमलात येण्याच्यापूर्वी तीन महिन्यांहून कमी नाही अशा अवधीपर्यंत समिती त्याची एक प्रत चावडीत किंवा दुसऱ्या कोणत्यातरी सार्वजनिक इमारतीत प्रदर्शित करील आणि त्या नियमाच्या संबंधातील आक्षेप, तो नियम अंमलात येण्याच्या तारखेपूर्वी-ही तारीख विनिर्दिष्ट केली पाहिजे-निदान एक महिना अगोदर जिल्हाधिकाऱ्याकडे लेखी दाखल केले असता ते दाखल करून घेतले जातील व त्यांवर विचार करण्यात येईल अशी एक नोटीस या नियमाच्या प्रतीस जोडील. नियम करण्यासंबंधीच्या तरतुदी.

(२) याप्रमाणे जे कोणतेही आक्षेप दाखल करण्यात येतील त्यांचा जिल्हाधिकारी, समितीशी [२] [विचारविनिमय] करून विचार करील. अशाप्रकारे विचार केल्यावर जर याप्रमाणे योजलेल्या नियमात फेरफार करणे किंवा तो मागे घेणे इष्ट आहे असे दिसून आले, तर त्यात त्याप्रमाणे फेरफार करणे किंवा रद्द करणे हे वर सांगितल्याप्रमाणे नोटीस लावून अंमलात आणले जाईल. एखाद्या नियमाचे प्रवर्तन निलंबित करणे इष्ट आहे असे जिल्हाधिकाऱ्याला वाटल्यास, त्यास, वर सांगितल्याप्रमाणे नोटीस लावून, त्याचे प्रवर्तन काही विनिर्दिष्ट कालावधीकरिता निलंबित करता येईल. या नोटिशीत, हा कालावधी संपण्यापूर्वी निदान एक महिना अगोदर या नियमासंबंधीचे आक्षेप वर सांगितल्याप्रमाणे दाखल केले असता ते दाखल करून घेतले जाऊन त्यांचा विचार करण्यात येईल असे नमूद करण्यात येईल. याप्रमाणे दाखल केलेल्या कोणत्याही आक्षेपांचा वर सांगितल्याप्रमाणे विचार करण्यात येईल आणि मग अशा नियमात फेरफार करणे किंवा तो रद्द करणे इष्ट आहे असे वाटल्यास त्याप्रमाणे वर सांगितलेल्या रीतीने अधिसूचित करण्यात येईल.

---

१ सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक, २२, कलम ३(१) अन्वये पोटकलम (इअ) समाविष्ट करण्यात आले.

२ सन १९३१ चा मुंबई अधिनियम क्रमांक, २५, कलम २ अन्वये, मूळ शब्दांऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

(३) पोटकलम (२) च्या तरतुदींच्या अधीनतेने समितीने जिल्हाधिकाऱ्याची मान्यता घेऊन केलेला व वर सांगितल्याप्रमाणे अधिसूचित केलेला प्रत्येक नियम हा, यासंबंधात जाहीर केलेल्या तारखेस अंमलात येईल.

नियमाविरुध्द अपराध करणाऱ्यावर खटला चालविणे.

**१३.** समितीने कलम ११ अन्वये केलेल्या कोणत्याही नियमाचे उल्लंघन गावातील कोणत्याही व्यक्तीने केले आहे किंवा त्याचे उल्लंघन केल्याचा त्याच्यावर आरोप आहे असे स्वच्छता समितीच्या नजरेस येईल किंवा तिला समजेल तेव्हा, अशी समिती अशा व्यक्तीस लेखी नोटीस देऊन समितीपुढे हजर होण्यास फर्मावू शकेल.

नियमाविरुध्द झालेल्या अपराधांची समितीने दखल घेणे.

**१४.** (१) समितीने कलम ११ अन्वये केलेल्या नियमांविरुध्द असलेले सर्व अपराध समितीकडून दखल घेतली जाण्यास पात्र असतील.

(२) या अधिकारितेचा वापर करण्याच्या प्रयोजनासाठी समितीची बैठक आवश्यक असेल तितक्या वेळा किंवा दंडाधिकारी निदेश देईल तितक्या वेळा गावातील चावडीत किंवा गावातील किंवा गावाजवळील कोणत्यातरी इतर सोईस्कर जागेत, भरवण्यात येईल.

(३) समिती, आरोपी व्यक्तीसमक्ष किंवा वर सांगितल्याप्रमाणे उक्त व्यक्तीवर नोटीस बजाविली असताही तो हजर न झाल्यास त्याच्या अनुपस्थितीत, अभिकथित अपराधासंबंधातील पुरावा व उक्त व्यक्तीने आपल्या बचावासाठी जो कोणताही पुरावा हजर केला असेल तो दाखल करून घेईल व त्यानंतर एकतर अपराधी व्यक्तीस दोषमुक्त करील किंवा त्यास सिध्दापराध ठरवील व जर त्यास सिध्दापराध ठरविण्यात आले तर तिला, या अधिनियमान्वये किंवा नियमांन्वये ठरविलेली जी शिक्षा समितीस वाजवी वाटेल, ती शिक्षा देऊ शकेल.

समितीच्या निकालाविरुध्द अपिले.

**१५.** (१) समितीने ज्या व्यक्तीस सिध्दापराध ठरविले असेल तिला शिक्षा दिल्यानंतर दहा दिवसांच्या आत कोणत्याही वेळी जिल्ह्याच्या दंडाधिकाऱ्याकडे किंवा राज्य शासनाने उच्च न्यायालयाशी विचारविनिमय करून [१] [या बाबतीत विशेषरीत्या अधिकार प्रदान केलेल्या कोणत्याही प्रथम वर्ग दंडाधिकाऱ्याकडे] अपील करता येईल.

(२) अशा व्यक्तीने अपील करण्याचा आपला हेतू असल्याची नोटीस देऊन तिला झालेल्या दंडाची रक्कम याबाबतीत जिल्ह्याच्या दंडाधिकाऱ्याने नेमलेल्या अधिकाऱ्याकडे अनामत ठेवल्यास, शिक्षा झाल्याच्या तारखेपासून दहा दिवस संपेपर्यंत, अगर अपील केलेले असल्यास, अपिलाचा निकाल होईपर्यंत झालेल्या शिक्षेची अंमलबजावणी निलंबित ठेवण्यात येईल. जर दहा दिवसांच्या आत अपील करण्यात आले नाही तर, अनामत ठेवलेल्या रकमेचा विनियोग, दंड म्हणून जी रक्कम बसविण्यात आली असेल ती देण्यासाठी करण्यात येईल.

(३) अपिलाची सुनावणी करणाऱ्या दंडाधिकाऱ्यास स्वच्छता समितीचा निकाल कायम करता येईल, फिरवता येईल किंवा त्यात फेरबदल करता येतील आणि समितीस देता आली असती अशा शिक्षेबाबत कोणताही आदेश करण्याचा अधिकार आहे. त्याच्या आदेशाची, स्वच्छता समितीने काढलेल्या एखाद्या आदेशाप्रमाणेच बजावणी करण्यात येईल.

(४) उक्त दंडाधिकाऱ्यास अपिलाचा निकाल होईपर्यंत, झालेली शिक्षा अंमलात आणण्याचे तहकूब करणे जरूर किंवा योग्य वाटेल, तेव्हा त्याला वाजवी वाटतील अशा अटीवर त्याप्रमाणे शिक्षा तहकूब करता येईल.

---

१ सन १९५१ चा मुंबई अधिनियम क्रमांक २३ च्या कलम २, अनुसूची-भाग तीन, अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

**१६.** गावासाठी पिण्याच्या स्वच्छ पाण्याचा पुरेसा पुरवठा करणे, गावातील सडका व खुल्या जागा यांची साफसफाई करणे व गावातील घृणास्पद व अपायकारक पदार्थ काढून नेणे या प्रयोजनांसाठी, आणि गावातील रहिवाशांच्या आरोग्यास व सुखास हितावह असणाऱ्या अशा इतर प्रयोजनांसाठी [१] [किंवा गावातील परिवास्तूंना क्रमांक किंवा उपक्रमांक देण्याच्या प्रयोजनासाठी] स्वच्छता समितीस, उपलब्ध असेल तेथवर, गावातील रहिवाशांनी स्वखुशीने केलेल्या मेहनतीचा आणि कलम ४२ अन्वये तिच्या अधिकाराखाली असलेल्या गावनोकरांच्या सेवांचा उपयोग करून घेता येईल, आणि जेव्हा ही साधने पुरेशी नसतील तेव्हा समितीस वेळोवेळी [२] [उक्त प्रयोजनांसाठी जरूर असतील तसे नोकर कामावर नेमता येतील आणि असा खर्च प्राधिकृत करता येईल.] स्वच्छता समितीला आवश्यक कामांचा किंवा उपाययोजनांचा खर्च प्राधिकृत करता येईल.

[३] [**१७.** स्वच्छता समितीस गावातील खुल्या जागेतील विक्रीकेंद्रावर पट्टी बसवता येईल आणि अशा रीतीने वसूल केलेली रक्कम ही, कलम ३०-ड खालील स्वच्छता समितीच्या निधीचा भाग होईल.] स्वच्छता समितीस खुल्या जागेतील विक्री केंद्रांवर पट्टी बसवता येईल.

[४] [**१८.** पैशाच्या ज्या कोणत्याही रकमेचा खर्च स्वच्छता समितीने प्राधिकृत केला असेल, ती रक्कम स्वेच्छा वर्गणीद्वारे उभारता येईल किंवा कलम १७ अन्वये पट्टी बसवून किंवा ती मिळवण्यास दुसरा कोणताही मार्ग नसल्यास गावातील रहिवाशांवर जिल्हाधिकाऱ्याच्या मान्यतेने निश्चित केलेली व स्वच्छता समितीने निर्धारित केलेली पट्टी बसवून वसूल करता येईल : खर्चाकरिता आवश्यक असलेला पैसा, स्वेच्छा वर्गणीद्वारे किंवा रहिवाशांवर पट्टी बसवून उभारता येईल.

परंतु,—

(१) कोणत्याही गावातील रहिवाशांकडून कोणत्याही वर्षी अशा पट्टीच्या रूपाने वसूल करावयाची एकूण रक्कम ही, जिल्हाधिकाऱ्याने (कारणे लेखी नमूद करून) परवानगी दिलेली असल्याखेरीज, त्या गावाकडून त्या वर्षात स्थानिक निधी उपकर म्हणून जी एकूण रक्कम वसुलीयोग्य असेल त्या रकमेच्या निम्म्याहून अधिक असता कामा नये ;

---

१ सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम ३(२) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

२ सन १९३१ चा मुंबई अधिनियम क्रमांक २५, कलम ३ अन्वये, मूळ मजकुराऐवजी हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

३ वरील अधिनियमाच्या कलम ४ अन्वये, मूळ कलमाऐवजी कलम १७ दाखल करण्यात आले.

४ वरील अधिनियमाच्या कलम ५ अन्वये, मूळ कलमाऐवजी कलम १८ दाखल करण्यात आले.

(२) अशा गावातील कोणत्याही रहिवाशांवर आकारलेल्या निर्धारणाविरुध्द त्या रहिवाशास त्याबाबत सूचना देण्यात आल्यापासून तीस दिवसांच्या आत जिल्हाधिकाऱ्याकडे अपील करता येईल, व त्याबाबतीत जिल्हाधिकाऱ्याचा निर्णय अंतिम असेल.]

स्वच्छता समितीने प्राप्तीचे व खर्चाचे वार्षिक विवरण तयार करणे.

[१][**१८-अ.** स्वच्छता समिती, पुढील वर्षाकरिता अंदाजलेली; प्राप्ती व खर्च दर्शविणारे अर्थसंकल्पीय विवरण दरवर्षी तयार करील व ते जानेवारी महिना संपण्यापूर्वी जिल्हाधिकाऱ्याकडे मान्यतेसाठी सादर करील. जिल्हाधिकारी, अशा अर्थसंकल्पात फेरबदल करून किंवा न करता त्यास मार्च अखेरपूर्वी मान्यता देईल. स्वच्छता समितीस, याप्रमाणे मान्यता दिलेल्या अर्थसंकल्पाच्या कक्षेत खर्च करता येईल परंतु अर्थसंकल्पात समाविष्ट नसलेला कोणताही आणखी खर्च करावा लागला तर त्याबाबत समितीने जिल्हाधिकाऱ्याची आगाऊ मंजुरी मिळविली पाहिजे.]

## भाग तीन

### स्वच्छता मंडळे

स्वच्छता मंडळाची रचना.

[२][**१९.** (१) हा भाग लागू केलेल्या प्रत्येक गावात एक स्वच्छता मंडळ असेल किंवा जिल्हाधिकारी निदेश देईल त्याप्रमाणे अशा दोन किंवा अधिक गावांच्या गटासाठी, असे एक मंडळ असेल. असे प्रत्येक मंडळ, जिल्हाधिकारी निर्धारित करील तितक्या, सातपेक्षा कमी नसतील इतक्या सदस्यांचे मिळून बनलेले असेल. त्यापैकी दोन-तृतीयांशाहून कमी नाहीत इतके सदस्य निवडून दिलेले असतील; परंतु मंडळाच्या प्राधिकार क्षेत्रातील प्रत्येक पन्नास घरांगणिक एक निवडून दिलेला सदस्य असेल. उर्वरित सदस्यांची ('नामनिर्देशित सदस्य' म्हणून संबोधावयाचे) नेमणूक जिल्हाधिकारी करील व त्यात सामान्यतः पोलीस-पाटलांचा समावेश असेल.

(२) जी कोणतीही व्यक्ती २१ वर्षांहून कमी वयाची असेल व जिच्यापाशी मतदाराची अर्हता नसेल अशा कोणत्याही व्यक्तीस मंडळाचा सदस्य होता येणार नाही.

(३) जी व्यक्ती--पुरूष अथवा स्त्री--१८ वर्षांहून कमी वयाची नसेल व जी मंडळाच्या प्राधिकाराखालील क्षेत्रात रहात असून त्यातील एखादी इमारत किंवा इतर स्थावर मालमत्ता यांचा मालक किंवा अंशतः मालक म्हणून, अथवा भाडेकरू किंवा पोट-भाडेकरू म्हणून भोगवटा करीत असेल व जिल्हाधिकाऱ्याने याबाबत केलेल्या नियमांन्वये ती इतर रीतीने निरर्ह ठरत नसेल, अशा प्रत्येक व्यक्तीस मंडळाच्या निवडणुकीत मतदान करण्याचा हक्क असेल.

(४) निवडणूक ही मामलेदाराने या प्रयोजनासाठी बोलवावयाच्या सभेत व तो याबाबत, संबंधित क्षेत्रातील जी जागा निश्चित करील अशा जागी व अशा तारखेस व अशा वेळी होईल. अशा सभेची नोटीस, सदरहू सभेत मतदान करण्यास पात्र असतील अशा व्यक्तींच्या एका यादीसह, निवडणुकीच्या तारखेपूर्वी निदान १५ दिवस अगोदर चावडीत चिकटविण्यात येईल.

(५) निवडणूक ही, हात उंचावून किंवा जिल्हाधिकारी तसा निदेश देईल तर, मतपत्रिकांद्वारे होईल. निवडणुकीची कार्यपध्दती व मतदारांच्या अर्हता यासंबंधीच्या सर्व प्रश्नांचा निर्णय मामलेदार, याबाबत केलेल्या नियमांअनुसार करील व त्याच्या आदेशाविरुध्द जिल्हाधिकाऱ्यांकडे अपील करता येईल आणि जिल्हाधिकाऱ्याने दिलेला निर्णय अंतिम असेल.

---

१ सन १९३१ चा मुंबई अधिनियम क्रमांक २५, कलम ५-अ अन्वये कलम १८ अ समाविष्ट करण्यात आले.

२ वरील अधिनियमाच्या कलम ६ अन्वये, मूळ कलमाऐवजी कलम १९ दाखल करण्यात आले.

(६) मंडळाच्या सदस्यांचा पदावधी तीन वर्षे असेल, तथापि, प्रत्येक सदस्य पुन्हा निवडून दिला जाण्यास किंवा नामनिर्देशित होण्यास पात्र असेल.

(७) मंडळ दरवर्षी, आपल्यापैकी एकास अध्यक्ष म्हणून निवडून देईल :

परंतु, तो गैरवर्तणुकीबद्दल अध्यक्षाच्या अधिकारपदावरून जिल्हाधिकाऱ्याच्या मंजुरीच्या अधीनतेने, मंडळाच्या एकंदर सदस्यांच्या दोन-तृतीयांश सदस्यांच्या मताने किंवा कलम ३२ मध्ये ठरविल्याप्रमाणे जिल्हाधिकाऱ्याकडून, काढून टाकला जाण्यास पात्र असेल.

(८) अध्यक्ष, मंडळाच्या प्रत्येक सभेत, अध्यक्षस्थान स्वीकारील. अध्यक्ष गैरहजर असल्यास मंडळाच्या सभेत त्या प्रसंगी सभापती होण्यासाठी हजर असलेल्या सदस्यांपैकी, सभा निवड करील असा, एक सदस्य अध्यक्षस्थान स्वीकारील.

(९) मंडळाच्या सभेची कार्यपध्दती ही, जिल्हाधिकाऱ्याने याबाबत केलेल्या नियमांस अनुसरून असेल.]

स्वच्छता मंडळास नियम करता येतील.

**२०.** स्वच्छता मंडळास, जिल्हाधिकाऱ्याच्या मान्यतेने, वेळोवेळी नियम करता येतील आणि यात यापुढे तरतूद केलेली असेल त्याव्यतिरिक्त एरव्ही, ते, त्याच्या प्राधिकाराच्या अधीन असलेल्या क्षेत्राच्या संबंधाने, यात यापूर्वी स्वच्छता समितीच्या बाबतीत अधिनियमित केले आहेत तशाच विषयांच्या संबंधात, तशाच रीतीने व तशाच तरतुदींच्या, निर्बंधांच्या व शर्तीच्या अधीनतेने कार्ये पार पाडील व प्राधिकाराचा वापर करील.

स्वच्छता निरीक्षक व इतर अधिकारी यांची नेमणूक.

**२१.** [१][(१) स्वच्छता मंडळास, वेळोवेळी, जिल्हाधिकाऱ्याच्या मंजुरीने मंडळाच्या प्राधिकाराच्या अधीनतेने, कोणत्याही क्षेत्राकरिता किंवा त्या क्षेत्राच्या कोणत्याही भागाकरिता स्वच्छता निरीक्षक नेमता येईल व त्याचे वेतन निर्धारित करता येईल. तसेच त्यास, तशाच मंजुरीने बडतर्फ करता येईल किंवा निलंबित करता येईल.]

(२) असा स्वच्छता निरीक्षक हा, त्या जागी प्राधिकार असणाऱ्या तालुका किंवा जिल्हा स्थानिक मंडळाने नोकरीस ठेवलेली व्यक्ती असू शकेल. दोन किंवा अधिक स्वच्छता मंडळांना किंवा त्यांच्या वतीने त्यास नोकरीवर ठेवता येईल.

[२][(३) स्वच्छता मंडळास, स्वच्छता निरीक्षकांच्या जोडीने आवश्यक वाटतील असे इतर दुय्यम कर्मचारी नेमता येतील आणि अशा प्रत्येकास द्यावयाच्या वेतनाची रक्कम निर्धारित करता येईल. तसेच त्यास उक्त दुय्यम कर्मचाऱ्यांना बडतर्फ करता येईल किंवा निलंबित करता येईल.]

स्वच्छता निरीक्षकाची कर्तव्ये.

**२२.** (१) स्वच्छता निरीक्षक, ज्या क्षेत्राकरिता त्याची नेमणूक करण्यात आली असेल त्या क्षेत्रात अंमलात असलेल्या नियमांचा भंग होण्यास प्रतिबंध करण्यासाठी वेळोवेळी पुढील गोष्टी करून उपाययोजना करील—

(अ) उक्त नियम पाळण्यासंबंधाने एक सर्वसाधारण ताकीद ठळक जागी लावील व इतर रीतीने प्रसिध्द करील; अथवा

---

१ सन १९३१ चा मुंबई अधिनियम क्रमांक २५, कलम ७ (१) अन्वये मूळ पोटकलमाऐवजी पोटकलम (१) दाखल करण्यात आले.

२ सन १९३१ चा मुंबई अधिनियम क्रमांक २५, कलम ७ (२) अन्वये पोटकलम ३ जादा दाखल करण्यात आले.

(ब) जी कोणतीही व्यक्ती उक्त नियमांपैकी कोणत्याही नियमाविरुध्द अपराध करताना त्याला आढळेल, त्याला ताकीद देईल; अथवा

(क) उक्त नियमांपैकी कोणत्याही नियमाविरुध्द अपराध केल्याबद्दल ज्या कोणत्याही व्यक्तीवर खटला भरला पाहिजे असे त्याच्या स्वत:च्या नजरेस आल्यावरून किंवा त्यास अधीन असलेल्या कर्मचाऱ्यांनी तक्रार केल्यावरून, त्यास सकारण वाटेल, त्या व्यक्तीस स्वच्छता मंडळापुढे हजर होण्यासाठी समन्स काढील.

(२) स्वच्छता निरीक्षक [१][[२][राज्य]शासन] विहित करील त्याप्रमाणे, या अधिनियमाद्वारे त्याच्यावर लादण्यात आलेल्या किंवा स्थानिक अथवा स्वच्छता मंडळाचा कर्मचारी म्हणून असलेल्या त्याच्या दर्जातून उद्‌भवणाऱ्या कर्तव्यांशी व आबंधनांशी सुसंगत असे अहवाल तयार करील व असे स्वच्छता आयुक्तांशी संबंध ठेवील.

नियमभंग केल्याबद्दल मंडळाने आपण होऊन खटला भरणे.

**२३.** मंडळास, कलम २० अन्वये मंडळाने केलेल्या कोणत्याही नियमाचा भंग केल्याचा आरोप असलेल्या कोणत्याही व्यक्तीला, अगर मंडळाच्या माहितीनुसार ज्या कोणत्याही व्यक्तीने हा भंग उघडपणे केलेला असेल त्या व्यक्तीला, लेखी नोटीस देऊन मंडळापुढे हजर होण्यास फर्माविता येईल.

नियमांविरुध्द झालेल्या अपराधांची मंडळाने दखल घेणे.

**२४.** (१) कलम २० अन्वये मंडळाने केलेल्या नियमांविरुध्द झालेले सर्व अपराध मंडळाने दखल घेण्यास पात्र असतील, आणि ही अधिकारिता चालविण्याच्या प्रयोजनासाठी मंडळ आपल्या प्राधिकाराच्या अधीन असलेल्या क्षेत्रात किंवा क्षेत्राजवळील एखाद्या सोईस्कर जागी जरूर पडेल तितक्या वेळा किंवा जिल्ह्याचा दंडाधिकारी निदेश देईल तितक्या वेळा मंडळाची सभा भरवील.

(२) कलम १४, पोट कलम (३) व कलम १५ यांतील तरतुदी, स्वच्छता मंडळाने या कलमान्वये करावयाच्या खटल्यांच्या सुनावणीस व निर्णयास आणि अशा मंडळाने ज्या व्यक्तींस सिध्दापराध ठरविले असेल त्या व्यक्तींनी करावयाच्या अपिलांना शक्य असेल तेथपर्यंत लागू होतील.

स्वच्छता मंडळाचे आदेश कोणी अंमलात आणावेत.

**२५.** (१) जिल्हाधिकारी याबाबत वेळोवेळी नामनिर्देशित करील असा मंडळाचा सदस्य किंवा मंडळाचा असा कोणताही अधिकारी किंवा असा अन्य अधिकारी प्रत्येक स्वच्छता मंडळाचे आदेश अंमलात आणील आणि मंडळाचे आदेश व त्याने चालविलेले कामकाज विहित रीतीने अभिलिखित करील व जतन करील.

(२) या संबंधात प्राधिकृत केलेली व्यक्ती मंडळाच्या कामकाजाची व त्याच्या आदेशांची आपल्या सहीनिशी यथार्थ नोंद ठेवील आणि या अधिनियमानुसार किंवा कलम २० अन्वये केलेल्या नियमांनुसार मंडळाने किंवा त्याच्या कोणत्याही सदस्याने दिलेल्या निदेशान्वये काढावयाची सर्व समन्से, नोटिसा व आदेश यथार्थपणे तयार करील.

**२६.** [विवक्षित करार करण्याचा स्वच्छता समितीचा अधिकार] हे कलम, सन १९३१ चा मुंबई अधिनियम क्रमांक २५, कलम ८ अन्वये निरसित करण्यात आले.

---

१ भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशान्वये, "सरकार" या शब्दाऐवजी "प्रांतिक सरकार" हे शब्द दाखल करण्यात आले.

२ विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

**२७.** प्रत्येक स्वच्छता मंडळास, [१] * * * * आपल्या प्राधिकारातील क्षेत्रांकरिता किंवा त्याच्या कोणत्याही भागाकरिता पुढील गोष्टींची तरतूद करण्यासाठी आवश्यक असतील ती कामे करता येतील व इमारती बांधता येतील-- स्वच्छता मंडळास ज्यांची तरतूद करता येईल अशी कामे व इमारती.

(अ) पाण्याचा पुरेसा पुरवठा करणे ;

(ब) कचरा, धूळ, राख, गाळ, केर, जनावरांची मढी व इतर घृणास्पद व अपायकारक पदार्थ तात्पुरते ठेवण्याकरिता किंवा त्यांची अंतिम विल्हेवाट लावण्यासाठी योग्य व सोईस्कर जागांची तरतूद करणे ;

(क) खंड (ब) मध्ये विनिर्दिष्ट केलेले निरनिराळे पदार्थ व वस्तू वाहून अथवा काढून नेण्याची साधने.

[२][**२८.** स्वच्छता मंडळास, स्वेच्छा वर्गणीद्वारे या अधिनियमाखालील मंडळाच्या प्रयोजनांपैकी कोणत्याही प्रयोजनासाठी पैशाची कोणतीही रक्कम उभारता येईल. अशी रक्कम स्वच्छता मंडळाच्या कलम ३०-ड खालील निधीचा भाग होईल व स्वच्छता मंडळास आपल्या प्राधिकाराच्या अधीन असलेल्या क्षेत्रात व या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी ती खर्च करता येईल.] स्वच्छता मंडळास स्वेच्छा वर्गणीद्वारे पैसा उभारता येईल.

**२९.** प्रत्येक स्वच्छता मंडळास, खाली दिलेल्या गोष्टींसाठी लागणाऱ्या खर्चाची तरतूद करणे किंवा तो खर्च प्राधिकृत करणे बंधनकारक असेल-- कोणत्या प्रयोजनासाठी स्वच्छता मंडळाने खर्च केला पाहिजे.

(अ) कलम २१ अन्वये नेमलेले स्वच्छता निरीक्षक व इतर कोणतेही अधिकारी असल्यास, त्यांचे वेतन देणे ;

(ब) मंडळाच्या आणि उक्त स्वच्छता निरीक्षक व इतर अधिकारी असल्यास त्यांच्या उपयोगाकरिता लेखनसामग्री व इतर जरुरीच्या वस्तू पुरविणे ;

(क) कलम [३][३०-क] अन्वये त्याने केलेली कोणतीही संविदा पूर्ण करणे ; आणि

(ड) कलम २७ अन्वये आवश्यक ती बांधकामे व इमारती बांधणे.

[४][**३०.** (१) स्वच्छता मंडळ हे, जिल्हाधिकारी विहित करील अशा नमुन्यात जमाखर्चाचा हिशेब ठेवील. अशा हिशेबाच्या खर्चाच्या बाजूस, या अधिनियमाच्या तरतुदीअन्वये प्राधिकृतरित्या केलेला सर्व खर्च घालण्यात येईल; जमेच्या बाजूस कलम २८ अन्वये स्वेच्छा वर्गणी मिळवून उभारलेल्या सर्व रकमा, मंडळाचा खर्च भागविण्यासाठी कोणत्याही इतर मार्गाने वसूल केलेल्या रकमा आणि या अधिनियमात पुढे तरतूद केल्याप्रमाणे कोणतीही पट्टी निर्धारित करून मिळालेले निव्वळ उत्पन्नही लिहिण्यात येईल. स्वच्छता मंडळाचे अर्थोपाय.

(२) तसेच मंडळ हे, जिल्हाधिकारी विहित करील अशा तारखेस किंवा तारखेपूर्वी व विहित करील अशा नमुन्यात आपल्या हिशेबांची वार्षिक विवरणपत्रे तयार करून ती जिल्हा स्थानिक मंडळाकडे सादर करील.

---

१ सन १९३१ चा मुंबई अधिनियम, क्रमांक २५, कलम ९ अन्वये "जिल्हाधिकाऱ्याच्या मान्यतेने" हा मजकूर निरसित करण्यात आला.

२ वरील अधिनियमाच्या, कलम १० अन्वये मूळ कलमाऐवजी कलम २८ दाखल करण्यात आले.

३ वरील अधिनियमाच्या, कलम ११ अन्वये "२६" या आकड्याऐवजी "३०-क" असा आकडा व अक्षर दाखल करण्यात आले.

४ वरील अधिनियमाच्या, कलम १२ अन्वये मूळ कलमाऐवजी कलम ३० दाखल करण्यात आले.

(३) या अधिनियमान्वये स्वच्छता मंडळाने अशा खर्चाकरिता आवश्यक असलेला पैसा उभारण्याच्या प्रयोजनासाठी मंडळास, जिल्हाधिकाऱ्याने याबाबत केलेल्या नियमांच्या अधीनतेने आपल्या प्राधिकाराच्या अधीन असलेल्या क्षेत्रातील किंवा त्या क्षेत्राच्या कोणत्याही भागातील रहिवाशांवर पट्टी ठरवून ती आकारता येईल :

परंतु,—

(१) त्याच्या प्राधिकाराच्या अधीन असलेल्या कोणत्याही क्षेत्राच्या रहिवाशांकडून कोणत्याही वर्षात वसूल करावयाची एकूण रक्कम जिल्हाधिकाऱ्याची परवानगी असेल (कारणे लेखी नमूद करून) त्याव्यतिरिक्त एरव्ही त्या क्षेत्राच्या रहिवाशांकडून त्या वर्षात स्थानिक निधी उपकर म्हणून जी एकूण रक्कम वसुलीजोगी असेल, त्या रकमेच्या निम्म्याहून अधिक असता कामा नये ;

(२) अशा क्षेत्राच्या कोणत्याही रहिवाशावर निर्धारित केलेली रक्कम, सदरहू रहिवाशास त्याबाबत नोटीस देण्यात आल्यापासून तीस दिवसांच्या आत, तिच्याविरुध्द जिल्हाधिकाऱ्याकडे अपील करता येण्याच्या अधीन असेल व जिल्हाधिकाऱ्याचा निर्णय अखेरचा असेल.]

## भाग चार

### सर्वसाधारण तरतुदी

स्वच्छता समित्या व स्वच्छता मंडळे कायद्याने संस्थापित करणे.

[१][**३०-अ.** प्रत्येक स्वच्छता समिती व स्वच्छता मंडळ यथास्थिति, '...................... ची स्वच्छता समिती' किंवा '................... चे स्वच्छता मंडळ' या नावाचा एक निगमनिकाय असेल व त्यांची अखंड अधिकार परंपरा असेल व त्यांची एक सामान्य मुद्रा असेल व निगम म्हणून असलेल्या त्याच्या नावाने, त्यास व त्याच्यावर दावा लावता येईल.]

मालमत्ता संपादन करण्याचा, धारण करण्याचा व हस्तांतरित करण्याचा अधिकार

[१][**३०-ब.** (१) स्वच्छता समितीस किंवा स्वच्छता मंडळास स्थावर व जंगम अशी दोन्ही प्रकारची मालमत्ता संपादन करता येईल व धारण करता येईल, मग ती त्यांच्या प्राधिकाराच्या अधीन असलेल्या एक किंवा अनेक गावांच्या हद्दींच्या आत असो किंवा बाहेर असो.

स्वच्छता समिती किंवा स्वच्छता मंडळ यांच्यामध्ये निहित असलेली मालमत्ता.

(२) यापुढे या पोटकलमात विनिर्दिष्ट केलेली सर्व मालमत्ता ही, एकतर [२][[३][राज्य]शासनाला] किंवा [२][[३][राज्य]शासनाने] याबाबत नेमलेल्या अधिकाऱ्याला किंवा ती ज्या जिल्हा किंवा तालुका स्थानिक मंडळाच्या मालकीची असेल किंवा त्याच्यामध्ये निहित असेल त्याला अशी मालमत्ता ज्या गावात असेल तेथे प्राधिकाराचा वापर करणाऱ्या समितीकडे किंवा मंडळाकडे हस्तांतरित करता येईल किंवा तिच्यामध्ये निहित करता येईल; आणि अशा हस्तांतरणानंतर उक्त मालमत्ता याप्रमाणे नेहमीकरिता निहित झाली असल्याचे मानण्यात येईल आणि ती व तिच्यासह समितीने/मंडळाने संपादन केलेली कोणत्याही स्वरूपाची किंवा प्रकारची इतर मालमत्ता आणि तिने/त्याने आपल्या परिव्ययाने बांधलेले प्रत्येक बांधकाम हे उक्त समितीच्या किंवा मंडळाच्या निदेशनाखाली, व्यवस्थापनाखाली व नियंत्रणाखाली असेल आणि समिती/मंडळ विश्वस्त म्हणून ती मालमत्ता या अधिनियमाच्या तरतुदींअन्वये व या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी धारण करील व तिचे उपयोजन करील ती म्हणजे—

---

१ सन १९३१ चा मुंबई अधिनियम क्रमांक २५, कलम १३ अन्वये ३०-अ, ३०-ब, ३०-क, ३०-ड, ३०-इ, ३०-फ व ३०-ग ही कलमे समाविष्ट करण्यात आली.

२ "सरकार" या शब्दाऐवजी "प्रांतिक सरकार" हे शब्द भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशान्वये दाखल करण्यात आले.

३ विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये, "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

(अ) सार्वजनिक बाजार, कत्तलखाने, खत व मैला ठेवण्याची आगारे, तात्पुरती विक्रीकेंद्रे उभारण्याच्या प्रयोजनांसाठी किंवा सामान्यतः कोणताही व्यापार किंवा धंदा चालविण्याच्या प्रयोजनासाठी लोकांकडून वापरण्यात येत असलेल्या जागा व सर्व प्रकारच्या सार्वजनिक इमारती ;

(ब) सार्वजनिक प्रयोजनांसाठी पाण्याचा पुरवठा, साठा किंवा वितरण करण्यासाठी असलेले सार्वजनिक ओढे, झरे, डबकी, टाक्या, तलाव, तळी, विहिरी, हौद, जलाशय, कालवे, नाले, नळ, पंप व इतर जलव्यवस्था केंद्रे व अशा जलव्यवस्था केंद्रांना जोडलेल्या किंवा त्यांच्याशी संबध्द असलेल्या सर्व इमारती, पूल, इंजिने, बांधकामे, सामग्री व वस्तू ;

(क) सार्वजनिक मलप्रणाल, नाल्या, मलकुंड्या, कचरा जाळण्याच्या भट्ट्या, पाण्याचे पाट, रस्त्याखालची गटारे, भुयारे व त्यासंबंधीची सर्व कामे, सामग्री व वस्तू ;

(ड) सार्वजनिक स्नानघाट व मनोरंजनार्थ मैदाने ;

(इ) सार्वजनिक दिवे, दिव्यांचे खांब व त्यास जोडलेला किंवा त्यासंबंधीचा उपकरण संच ;

(फ) सार्वजनिक सडका व त्यांची फरसबंदी, दगड व इतर सामग्री व अशा सडकांवर विद्यमान असलेली सर्व झाडे, बांधकामे, अवजारे व वस्तू ; आणि

(ग) स्थानिक सार्वजनिक प्रयोजनांसाठी देणगीने, खरेदीने किंवा इतर प्रकारे समितीला [१] [किंवा] मंडळाला हस्तांतरित करण्यात आलेली जमीन किंवा इतर मालमत्ता.]

संविदा करण्याची पध्दती.

[२] [**३०-क.** (१) या अधिनियमाच्या तरतुदींच्या अधीनतेने प्रत्येक स्वच्छता समिती व प्रत्येक स्वच्छता मंडळ, या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी त्यांच्यामध्ये निहित झालेली किंवा त्यांनी संपादन केलेली कोणतीही जंगम किंवा स्थावर मालमत्ता रीतसर अभिलिखित केलेल्या ठरावाद्वारे पट्ट्याने देण्यास, विकण्यास किंवा अन्यथा हस्तांतरित करण्यास; आणि या अधिनियमांच्या प्रयोजनासाठी या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसेल तेथवर, त्यास जरूर वाटतील अशा सर्व संविदा करण्यास व अशा संविदा पार पाडण्यास व अशा इतर सर्व गोष्टी करण्यास सक्षम असतील :

परंतु, शंभर रुपयांहून जास्त खर्च अंतर्भूत असलेल्या संविदा किंवा स्थावर मालमत्तेची खरेदी (तसलाच खर्च अंतर्भूत असणारी), जिल्हाधिकाऱ्याच्या आगाऊ मंजुरीवाचून करता येणार नाही :

परंतु आणखी असे की, तीन वर्षांहून जास्त कालावधीच्या, स्थावर मालमत्तेच्या प्रत्येक पट्ट्याच्या बाबतीत आणि अशा मालमत्तेच्या विक्रीच्या किंवा इतर हस्तांतरणाच्या प्रत्येक बाबतीत, जिल्हाधिकाऱ्याच्या आगाऊ मंजुरीची आवश्यकता आहे.

(२) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कायद्यांन्वये जो जो करार लेखी असणे आवश्यक असेल अशा प्रत्येक करारावर, समितीच्या बाबतीत सभापतीने किंवा मंडळाच्या बाबतीत अध्यक्षाने सही केलेली असली पाहिजे व त्यावर समितीची किंवा मंडळाची सामान्य मुद्रा उमटवलेली असली पाहिजे.]

स्वच्छता समिती किंवा स्वच्छता मंडळ यांचा निधी.

[२] [**३०-ड.** या किंवा इतर कोणत्याही अधिनियमाच्या सामर्थ्याने स्वच्छता समिती किंवा स्वच्छता मंडळ यास किंवा यांच्या वतीने मिळालेला सर्व पैसा; या अधिनियमान्वये त्यांस दिलेल्या किंवा त्यांनी किंवा त्यांच्या वतीने बसविलेल्या सर्व पट्ट्या, दंड फी व शास्ती; स्वच्छता समितीने किंवा स्वच्छता मंडळाने विकलेली जमीन किंवा इतर मालमत्ता यांचे सर्व उत्पन्न व त्यांच्या जमिनीपासून किंवा इतर मालमत्तेपासून उपार्जित होणारी सर्व भाडी; व [३] [कोणत्याही शासनाकडून] किंवा खाजगी व्यक्तींकडून किंवा इतर प्रकारे देणगीद्वारे किंवा हस्तांतरणाद्वारे उपार्जित होणारे सर्व व्याज, नफे व इतर पैसा यांचा मिळून स्वच्छता समिती किंवा स्वच्छता मंडळ निधी तयार होईल; व तो पैसा या अधिनियमाच्या तरतुदींच्या अधीनतेने व त्या प्रयोजनार्थ विश्वस्त म्हणून ती/ते धारण करील व त्याचे उपयोजन करील.]

---

१ सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५३, कलम ३, दुसरी अनुसूची याअन्वये "किंवा" हा शब्द बदली दाखल करण्यात आला.

२ सन १९३१ चा मुंबई अधिनियम क्रमांक २५, कलम १३ अन्वये ३०-अ, ३०-ब, ३०-क, ३०-ड, ३०-इ, ३०-फ व ३०-ग ही कलमे समाविष्ट करण्यात आली.

३ भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशान्वये, "सरकारकडून" या शब्दाऐवजी "कोणत्याही शासनाकडून" हे शब्द दाखल करण्यात आले.

स्वच्छता समिती किंवा स्वच्छता मंडळ यांची मालमत्ता व निधी यांचे उपयोजन कसे करावे.

[1] [**३०-इ.** या अधिनियमान्वये स्वच्छता समितीमध्ये किंवा स्वच्छता मंडळामध्ये निहित असलेली सर्व मालमत्ता व या अधिनियमाच्या तरतुदीनुसार तिला/त्याला किंवा तिच्या/त्याच्या वतीने प्राप्त झालेली सर्व निधी व त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याच्या तरतुदींअनुसार तिच्याकडे/त्याच्याकडे उपार्जित होणाऱ्या सर्व रकमा या, स्वच्छता समिती किंवा स्वच्छता मंडळ, त्यांची ज्या क्षेत्रासाठी रचना करण्यात आली असेल त्या क्षेत्राच्या हद्दीमध्ये, या अधिनियमाच्या तरतुदींच्या अधीनतेने व या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ धारण करील व त्यांचे उपयोजन करील :

परंतु, स्वच्छता समितीने किंवा स्वच्छता मंडळाने जिल्हाधिकाऱ्याच्या मंजुरीने सदरहू हद्दीमध्ये राहणाऱ्या लोकांच्या लाभार्थ उक्त हद्दींच्या पलीकडे बांधकामे बांधणे, ती सुस्थितीत ठेवणे किंवा दुरूस्त करणे यासाठी खर्च करणे विधिसंमत असेल :

परंतु आणखी असे की, स्वच्छता समितीने किंवा स्वच्छता मंडळाने तशीच मंजुरी घेऊन, त्यांच्या खाती जमा असलेल्या रकमेतील विनियोग न होता शिल्लक राहिलेल्या कोणत्याही रकमेतून मुंबई स्थानिक मंडळ अधिनियम, १९२३ याच्या कलम ५० अन्वये त्यांच्याकडे सोपविण्यात आलेल्या कर्तव्यांची परिपूर्ती करताना स्थानिक मंडळाकडून केल्या जात असलेल्या कोणत्याही बांधकामाच्या परिव्ययापोटी आपणास इष्ट वाटेल अशा अटींवर, इष्ट वाटेल असे अंशदान देणे विधिसंमत असेल.] १९२३ चा मुंबई ६.

अधिशेष निधी ठेव म्हणून ठेवण्याचा व व्याजी लावण्याचा अधिकार.

[1] [**३०-फ.** (१) स्वच्छता समितीने किंवा स्वच्छता मंडळाने चालू खर्चाकरिता ज्यांची आवश्यकता नसेल असे त्यांच्या हाती असलेले कोणतेही अधिशेष निधी, हे स्वच्छता समिती किंवा स्वच्छता मंडळ यांच्या नावाने, जिल्हाधिकारी मान्य करील अशा बँकेत ठेव म्हणून ठेवणे व जिल्हा नगरपालिका अधिनियम, १९०१, कलम ३, खंड (१८) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे असलेल्या सरकारी रोख्यांत असे निधी गुंतविणे व आवश्यक असेल तेव्हा वेळोवेळी अशा रोख्यांची व्यवस्था लावणे हे विधिसंमत असेल. १९०१ चा मुंबई ३.

(२) चालू खर्चाकरिता लागणाऱ्या रकमेपेक्षा जादा असलेले निधी, पोट-कलम (१) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे ठेव म्हणून ठेवण्यात किंवा गुंतवण्यात आले नसतील तर ते सर्व स्थानिक शासकीय कोषागारात किंवा स्वच्छता समिती अथवा स्वच्छता मंडळ यांच्या नियमांत मंजूर करण्यात येईल अशा इतर कोणत्याही सुरक्षित स्थळी ठेवण्यात येतील.]

स्वच्छता समिती किंवा स्वच्छता मंडळ अस्तित्वात असण्याचे बंद झाल्यास किंवा तिची/त्याची अधिकारिता बंद झाल्यास तिची/त्याची मालमत्ता व हक्क यांचे निहितीकरण.

[1] [**३०-ग.** जेव्हा कोणतीही स्वच्छता समिती किंवा स्वच्छता मंडळ अस्तित्वात असण्याचे बंद होईल किंवा त्याच्या प्राधिकाराखालील कोणत्याही क्षेत्रावर त्याची अधिकारिता असण्याचे बंद होईल, तेव्हा या अधिनियमान्वये अशी समिती किंवा मंडळ यांच्यामध्ये निहित असलेली सर्व मालमत्ता व हक्क हे, त्याच्याशी संबंधित असलेले सर्व भार व दायित्वे यांच्या अधीनतेने, अशा समितीची किंवा मंडळाची ज्या क्षेत्रावर अधिकारिता असण्याचे बंद झाले असेल ते क्षेत्र ज्या तालुक्यात असेल त्या तालुक्याच्या, तालुका स्थानिक मंडळामध्ये निहित होतील :

---

१ सन १९३१ चा मुंबई अधिनियम, क्रमांक २५, कलम १३, अन्वये ३०-अ, ३०-ब, ३०-क, ३०-ड, ३०-इ, ३०-फ व ३०-ग ही कलमे समाविष्ट करण्यात आली.

परंतु [१] [[२] [राज्य] शासनाने] किंवा जिल्हा स्थानिक मंडळाने अशा समितीकडे किंवा मंडळाकडे हस्तांतरित किंवा निहित केली असेल अशी मालमत्ता ही, वरीलप्रमाणे बंद होण्याचे घडल्यावर, यथास्थिति, [३] [राज्य शासनाकडे] किंवा जिल्हा स्थानिक मंडळाकडे प्रत्यावर्तित होईल.]

शासनाच्या विवक्षित अधिकाऱ्यांनी स्वच्छता समित्यांना व मंडळांना सल्ला देणे.

**३१.** याबाबत ज्याची नेमणूक जिल्हाधिकारी सर्वसाधारणरित्या किंवा विशेषरित्या करील अशा, स्वच्छता आयुक्ताच्या किंवा स्थानिक मंडळाच्या, त्या जागी प्राधिकार असणाऱ्या जिल्ह्याच्या कार्यकारी अभियंत्याला किंवा कार्यकारी अभियंत्यास दुय्यम असणाऱ्या अधिकाऱ्याला [४] [मुंबई स्थानिक मंडळ अधिनियम, १९२३ च्या कलम ४० च्या पोटकलम (१)] अन्वये स्थानिक मंडळाच्या संबंधात विवक्षित अधिकाऱ्यांकडे जे हक्क व कर्तव्ये सोपविण्यात येतात असे हक्क व कर्तव्ये असतील.

१९२३ चा मुंबई ६.

स्वच्छता समित्या व मंडळे यांच्या सदस्य इत्यादींना अधिकारपदावरून काढून टाकणे.

**३२.** जिल्हाधिकाऱ्यास, [५] [संबंधित व्यक्तीस तिचे म्हणणे ऐकवण्याची संधी दिल्यानंतर व त्याबाबतची आपली कारणे नमूद केल्यानंतर] स्वच्छता समितीच्या कोणत्याही सदस्यास किंवा सभापतीस आणि [६] [आयुक्ताच्या] मंजुरीने स्वच्छता मंडळाच्या कोणत्याही सदस्यास किंवा अध्यक्षास, तो अकार्यक्षम असल्याचे दिसून आल्यास अगर जेणेकरून त्यास अधिकारपदावरून काढून टाकणे इष्ट ठरेल अशी कोणतीही गैरवर्तणूक किंवा हयगय केल्याबद्दल तो दोषी असल्यास, त्यास अधिकारपदावरून काढून टाकता येईल.

रिकाम्या झालेल्या जागा भरणे.

**३३.** (१) जेव्हा जेव्हा कोणत्याही कारणास्तव स्वच्छता समितीच्या कोणत्याही सदस्याची किंवा सभापतीची अगर स्वच्छता मंडळाच्या कोणत्याही सदस्याची किंवा अध्यक्षाची जागा रिकामी होईल किंवा होण्याच्या बेतात असेल, तेव्हा जिल्हाधिकारी विनाविलंब अशी रिकामी जागा भरण्याकरिता एका व्यक्तीची नेमणूक करील.

(२) अशी कोणतीही जागा रिकामी राहील तोपर्यंत जणु काही ती रिकामी झालेली नसावी त्याप्रमाणे स्वच्छता समितीचे किंवा मंडळाचे चालू सदस्य कृति करतील.

---

१ भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशान्वये, "सरकारकडून" याऐवजी "प्रांतिक सरकारकडून" हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

२ विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये 'प्रांतिक' या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

३ भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशान्वये, "सरकार" याऐवजी "क्राउन फॉर दि परपजेस ऑफ दि प्रॉव्हिन्स" हे शब्द आणि विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "क्राउन फॉर दि परपजेस ऑफ दि प्रॉव्हिन्स" या शब्दाऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

४ सन १९३१ चा मुंबई अधिनियम क्रमांक २५, कलम १४ अन्वये "१८८४ चा मुंबई अधिनियम क्रमांक १ च्या कलम ३३ चा पहिला परिच्छेद" या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

५ वरील अधिनियमाच्या कलम १४-अ अन्वये "त्यासाठी त्यांची कारणे नमूद केल्यानंतर" या शब्दाऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

६ मुंबई विकेंद्रीकरण अधिनियम १९१५ (१९१५ चा मुंबई ३) अन्वये "सरकारच्या" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

प्रश्नांचा निर्णय बहुमताने करणे.

**३४.** स्वच्छता समितीपुढे किंवा मंडळापुढे निर्णयासाठी येणाऱ्या प्रत्येक प्रश्नाचा निर्णय हा, अशा समितीच्या किंवा मंडळाच्या विहित सभेत, अगर जिल्हाधिकाऱ्याच्या निदेशाने किंवा अन्यथा सर्व सभासदांना रितसर सूचना पाठविल्यानंतर भरलेल्या सभेत हजर असलेल्या व मतदान करणाऱ्या सदस्यांच्या बहुमताने करण्यात येईल. समसमान मते पडतील तेव्हा अध्यक्षस्थानी असणाऱ्या सदस्यास दुसरे किंवा निर्णायक मत देता येईल.

समन्से इ. वर सही करणे.

**३५.** स्वच्छता समिती किंवा स्वच्छता मंडळ यांनी अगर त्यांच्या प्राधिकाराने काढलेली समन्से, नोटीसा व आदेश यांवर अशा समितीच्या किंवा मंडळाच्या कोणत्याही सभेत अध्यक्षस्थानी असणाऱ्या सदस्यांस समितीच्या किंवा मंडळाच्या वतीने सही करता येईल.

या अधिनियमान्वये केलेल्या नियमांचा भंग केल्याबद्दल शिक्षा.

**३६.** स्वच्छता समितीने किंवा मंडळाने या अधिनियमान्वये कलम ११ च्या खंड (अ) आणि (ब) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या बाबींहून अन्य कोणत्याही बाबींच्या संबंधात केलेल्या कोणत्याही नियमाचा भंग हा, उक्त नियमाद्वारे कमी कमाल शिक्षा विहित केलेली असल्यास ते खेरीज करून, दहा रुपयांपर्यंत वाढवता येईल इतक्या दंडास, आणि तो न भरल्यास अठ्ठेचाळीस तासांपर्यंत वाढवता येईल इतक्या कालावधीकरिता चावडीत बंदिवासात ठेवण्याच्या शिक्षेस पात्र ठरेल, आणि, भंग चालू राहिल्यास पहिल्या भंगाच्या अपराधसिध्दीनंतर किंवा समितीकडून अथवा मंडळाकडून अथवा स्वच्छता निरीक्षकांकडून नोटीस मिळाल्यानंतर दर दिवसाला दोन रुपयांपर्यंत वाढवता येईल इतक्या दंडाच्या शिक्षेस पात्र ठरेल व दंड भरण्यास कसूर केल्यास उपरोक्त बंदिवासाच्या शिक्षेस पात्र ठरेल.

दंड वसूल करण्याबद्दलचा आदेश.

**३७.** (१) कोणत्याही स्वच्छता समितीस किंवा मंडळास दंडाची शिक्षा झालेल्या कोणत्याही व्यक्तीस, प्रतिभूतीच्या संबंधाने त्या समितीस किंवा मंडळास आवश्यक वाटतील अशा अटींवर दंडाची रक्कम भरण्यासाठी चार दिवसांहून अधिक नसेल असा, त्यास योग्य वाटेल असा कोणताही अवधी देता येईल.

(२) दंडाची रक्कम देण्यात कसूर केलेली असेल तेव्हा, शिक्षादेश देणारी अगर जिच्या निकालावर अपील होऊन शिक्षादेश झाला असेल त्या स्वच्छता समितीस किंवा मंडळास आपल्या विवेकाधिकारानुसार दंडाची रक्कम भरण्यात न आल्यास, अपराध्यास बंदिवासात ठेवावे असा शिक्षादेशात निदेश केला असला तरी, आणि अपराध करणारा अटकेत असला किंवा त्याने अटकेची शिक्षा भोगली असली तरी, दंडाची रक्कम वसूल करण्याविषयी लेखी निदेश देता येईल.

दंड व पट्ट्या वसूल करणे.

**३८.** जे दंड वसूल करण्यासाठी वर सांगितल्याप्रमाणे आदेश दिला असेल ते सर्व दंड, आणि या अधिनियमान्वये बसविलेल्या कोणत्याही पट्टीदाखल निर्धारित केलेल्या सर्व रकमा, वाजवी नोटीस दिल्यानंतर भरण्यात आल्या नसतील तर हुकूमनामे बजाविण्याच्या कामी जंगम मालमत्ता विकावयाच्या संबंधाने [१] दिवाणी प्रक्रिया संहितेमध्ये जे अपवाद अधिनियमित केलेले आहेत त्यांच्या अधीनतेने, सदरहू दंड अगर रकमा देण्यास दायी असलेल्या व्यक्तीची जंगम मालमत्ता अटकावून व विकून, पाटलाने किंवा या बाबतीत जिल्हाधिकारी किंवा जिल्हाधिकाऱ्याच्या मंजुरीने, स्वच्छता समिती अगर मंडळ नेमील अशा अन्य व्यक्तीने वसूल करण्याजोग्या असतील. १८८२ चा १४.

**३९.** [दंडाचे निव्वळ उत्पन्न ज्या गावामध्ये अपराध घडून येतील अशा गावांवर प्राधिकार असणारी समिती किंवा मंडळ यांच्या खाती जमा करणे.] सन १९३१ चा मुंबई अधिनियम क्रमांक २५ च्या कलम १५ अन्वये निरसित केले.

स्थानिक मंडळाकडून अंशदाने व कर्जे

**४०.** (१) कोणत्याही जिल्हा किंवा तालुका स्थानिक मंडळास आपल्याकडे सोपवलेल्या स्थानिक निधीच्या भागापैकी आपणास योग्य वाटेल ती रक्कम या अधिनियमात योजलेल्या कोणत्याही प्रयोजनाकरिता खर्च करण्यासाठी, आपल्या प्राधिकाराच्या अधीन असलेल्या कोणत्याही गावाच्या किंवा

१ आता सन १९०८ चा अधिनियम, क्रमांक ५ पहा.

गावांच्या समुदायाच्या स्वच्छता समितीकडे अगर मंडळाकडे देणगीच्या किंवा कर्जाच्या रूपाने वेळोवेळी अभिहस्तांकित करता येईल.

[१] * * * * * * * *

[२] (२) परंतु जिल्हाधिकाऱ्याच्या मंजुरीवाचून कोणतीही रक्कम कर्जाच्या रूपाने याप्रमाणे अभिहस्तांकित करता येणार नाही ; आणि अशा मंजुरीने कर्जाच्या रूपाने दिलेली प्रत्येक रक्कम स्वच्छता समिती किंवा मंडळ यांनी [३] [जिल्हाधिकाऱ्याच्या मान्यतेने] अशा समितीच्या किंवा मंडळाच्या प्राधिकारातील क्षेत्रातील रहिवाश्यांवर पट्टी आकारून व निर्धारित करून सदरहू पक्षकारांच्या दरम्यान संमत होतील अशा व्याजाच्या व मुद्दलाच्या हप्त्यांनी जिल्हाधिकाऱ्याने वसूल करण्याजोगी असेल.

ज्यामध्ये दोन किंवा अधिक स्वच्छता समित्या किंवा मंडळे संयुक्तरित्या हितसंबंधित असतील अशी कामे पार पाडणे.

**४१.** (१) निरनिराळ्या स्वच्छता समित्या किंवा मंडळे यांच्या प्राधिकारातील दोन किंवा अधिक गावांना पाण्याचा पुरवठा करण्याची कामे किंवा त्यांतील जलनिःसारणाची कामे, आणि अशा दोन किंवा अधिक गावांच्या समाईक आरोग्यास किंवा सुखास हितावह असे इतर कोणतेही काम किंवा उपाययोजना ही, अशा सर्व समित्या किंवा मंडळे यांनी किंवा त्यापैकी अधिसंख्य समित्यांनी किंवा मंडळांनी जिल्हाधिकाऱ्याची मान्यता घेऊन विनंती केल्यास, जिल्हाधिकाऱ्यास, त्याच्या अगर याबाबत [४] [आयुक्त नेमील] अशा इतर अधिकाऱ्याच्या निदेशनाखाली पार पाडता येईल.

अशा कामांच्या परिव्ययाची वसुली.

(२) अशा कोणत्याही कामाचा किंवा उपाययोजनेचा परिव्यय निरनिराळ्या समित्या व मंडळे यांच्यामध्ये, ती आपापसात संमत होतील अशा प्रमाणात किंवा अशी संमती घडून न आल्यास जिल्हाधिकारी निर्धारित करील त्या प्रमाणात विभागण्यात येईल ; आणि अशा प्रत्येक समितीने व मंडळाने, प्राधिकाराच्या अधीन असलेल्या त्या त्या क्षेत्रातील रहिवाशांवर [५] [जिल्हाधिकाऱ्याच्या मान्यतेने] कलम १८, खंड (१) खाली पट्ट्या आकारण्याच्या संबंधात कलम १८, खंड (२) अन्वये तरतूद केलेल्या मर्यादांच्या अधीनतेने पट्टी आकारून व निर्धारित करून उक्त प्रमाणात वसूल करण्याजोगा असेल.

---

१ सन १९३१ चा मुंबई अधिनियम क्रमांक २५, कलम १६ (१) अन्वये पोटकलम (२) निरसित करण्यात आले.

२ वरील अधिनियमाच्या कलम १६ (२) अन्वये पोटकलम (३) ला पोटकलम (२) असा फेरक्रमांक देण्यात आला.

३ वरील अधिनियमाच्या कलम १६ (२) अन्वये "चर्चा करून, जिल्हाधिकाऱ्याने" या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

४ मुंबई विकेंद्रीकरण अधिनियम १९१५ (१९१५ चा मुंबई ३) अन्वये "सरकार नेमील" या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

५ सन १९३१ चा मुंबई अधिनियम क्रमांक २५, कलम १७ अन्वये "चर्चा करून जिल्हाधिकाऱ्याने" या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

स्वच्छता समितीने किंवा मंडळाने योजलेले काम तिने/त्याने, स्थानिक मंडळ हाती घेणार असलेल्या कामाखातर सोडून देणे.

(३) जेव्हा या अधिनियमान्वये रचना केलेल्या समितीने किंवा मंडळाने हाती घेतलेले किंवा योजलेले कोणतेही काम हे, जेणेकरून जिल्हा किंवा तालुका स्थानिक मंडळाने हाती घेतलेल्या किंवा योजलेल्या कोणत्याही कामास अडथळा येईल किंवा ते मोठ्या प्रमाणात बाधक होईल अशा प्रकारचे असेल तेव्हा अशा स्थानिक मंडळास, त्या स्वच्छता समितीस किंवा मंडळास वर सांगितलेल्या प्रकारचे काम बंद करण्यास लावता येईल ; आणि मग सोडून दिलेल्या कामाद्वारे आरोग्य, स्वच्छता व सुखसोय यांची जी साधने प्राप्त झाली असती तशासारखीच साधने उक्त स्वच्छता समितीच्या किंवा मंडळाच्या प्राधिकाराखालील क्षेत्रास वाजवी कालावधीत पुरवण्यासाठी वाजवी तरतूद करणे हे जिल्हा किंवा तालुका स्थानिक मंडळाचे कर्तव्य असेल.

अशा प्रकरणांत स्थानिक मंडळांना माहिती मागविता येईल.

(४) वरील खंडाच्या तरतुदी लागू असतील असे जे कोणतेही काम करण्याचे योजिले असेल किंवा त्याचे बांधकाम चालू असेल त्या कामाच्या संबंधाने माहिती मिळवण्याच्या प्रयोजनार्थ, तालुका किंवा जिल्हा स्थानिक मंडळाने, स्वच्छता समितीकडून व मंडळाकडून आवश्यक व वाजवी असतील असे अहवाल मागवणे आणि त्यास या बाबतीत आवश्यक वाटेल त्याप्रमाणे आपल्या सेवेतील एखाद्या व्यक्तीकडून निरीक्षण करून घेण्याची व अहवाल मागवण्याची तजवीज करणे हे विधिसंमत असेल ; आणि संबंधित स्वच्छता समितीने व मंडळाने, अशा फर्मानाचे अनुपालन करणे व उपरोक्तरित्या आदेश दिलेल्या कोणत्याही निरीक्षणास वाजवी मदत देणे व चालना देणे हे त्यांचे कर्तव्य असेल.

विवक्षित गावनोकर स्वच्छता समितीच्या किंवा मंडळाच्या आधिपत्याखाली देणे.

**४२.** जिल्हाधिकाऱ्याला, जे गावनोकर, स्वच्छता किंवा साफसफाई यांचा अंतर्भाव असणाऱ्या सेवांबद्दल पूर्णतः किंवा अंशतः पारिश्रमिकाच्या रूपाने जमीन धारण करीत असतील, जमिनीपासून मिळणारे फायदे घेत असतील किंवा इतर वित्तलब्धी घेत असतील त्यांना [१] [आयुक्ताच्या] नियंत्रणाच्या अधीनतेने, अशा सेवा ज्या जागेच्या संबंधात देय असतील त्या जागेमध्ये प्राधिकार असणाऱ्या स्वच्छता समितीच्या किंवा मंडळाच्या आधिपत्याखाली व अधीक्षणाखाली ठेवता येईल. या कर्मचाऱ्यांनी समितीच्या किंवा मंडळाच्या आदेशांची, या अधिनियमाखाली तयार केलेल्या कोणत्याही नियमात तरतूद करण्यात येईल अशा वाजवी शास्तीसहित परिपूर्ती करणे हे त्यांना बंधनकारक असेल.

स्वच्छता समिती किंवा मंडळ यांच्या आधिपत्याखाली ठेवलेल्या गावनोकरांना द्यावयाची रक्कम निर्धारित करणे व ती वसूल करणे.

**४३.** (१) जिल्हाधिकारी,—

(अ) वरील शेवटच्या कलमान्वये स्वच्छता समितीच्या किंवा मंडळाच्या आधिपत्याखाली त्यांच्याशी संबंधित असलेल्या गावनोकरांना, रिवाजाप्रमाणे किंवा मुंबई वंशपरंपरागत अधिकारपदे अधिनियम याच्या कलम १८, १९ किंवा २० मधील कोणत्याही व्यवस्थेअन्वये, कोणत्याही वेळी येणे असणाऱ्या रकमेसंबंधीच्या सर्व प्रश्नांचा निर्णय करील ; आणि

१८७४ चा मुंबई ३.

---

१ मुंबई विकेंद्रीकरण अधिनियम १९१५ (१९१५ चा मुंबई ३) अन्वये "सरकारच्या" या शब्दांऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

(ब) जरूर असल्यास त्याने निर्णीत केलेली येणे रक्कम किंवा तो वस्तुरूपाने असल्यास, तिचे त्या त्या वेळी असलेल्या बाजारभावाने असलेले मूल्य, ज्यास ती मिळण्याचा हक्क असेल त्या गावनोकराच्या वतीने जमीनमहसुलाच्या थकबाकीप्रमाणे, कोणताही आकार न घेता, वसूल करण्याची तजवीज करील :

(२) परंतु, एखाद्या गावनोकराने ज्या कर्तव्याबद्दल ती रक्कम त्यास देणे असेल ते कर्तव्य योग्य रितीने बजावलेले नाही असे जिल्हाधिकाऱ्यास वाटल्यास, जिल्हाधिकाऱ्यास त्या गावनोकराच्या वतीने अशी वसुली करण्याची तजवीज करण्याचे नाकारता येईल.

जिल्हाधिकाऱ्याचे या अधिनियमाखालील कार्याधिकार प्रत्यायोजित करता येतील.

**४४.** या अधिनियमान्वये जिल्हाधिकाऱ्यास प्रदान केलेला कोणताही अधिकार किंवा त्याच्यावर लादलेले कोणतेही कर्तव्य [१] * * * * सहायक किंवा उप-जिल्हाधिकाऱ्याकडे [२] प्रत्यायोजित करता येईल.

जिल्हाधिकारी, दंडाधिकारी व इतर लोकसेवक हे आपला प्राधिकार वापरताना परिपाठी नियंत्रणाच्या अधीन असतील.

**४५.** जिल्हाधिकारी, दंडाधिकारी व इतर शासकीय कर्मचारी यांना या अधिनियमान्वये नेमून दिलेली कर्तव्ये बजावताना व अधिकार वापरताना ते, आपली नेहमीची कर्तव्ये बजावण्याच्या संबंधाने ज्या निर्बंधाच्या अधीन असतात त्याच निर्बंधाच्या अधीन असतील.

या अधिनियमान्वये सद्‌भावपूर्वक काम करणाऱ्या व्यक्तींचे दायित्व निराकरण.

**४६.** (१) कोणताही दंडाधिकारी, जिल्हाधिकारी, स्वच्छता समितीचा किंवा मंडळाचा अध्यक्ष अगर सदस्य किंवा स्वच्छता निरीक्षक हा, या अधिनियमान्वये त्यास प्रदान केलेल्या कोणत्याही प्राधिकाराच्या किंवा त्याच्यावर लादलेल्या कोणत्याही कर्तव्याच्या उद्देशित पुष्ट्यर्थ सद्‌भावपूर्वक केलेल्या कोणत्याही कृत्याबद्दल, कोणतीही शक्ती होण्यास किंवा नुकसानभरपाई भरण्यास दायी असणार नाही.

(२) तसेच, कोणताही लोकसेवक किंवा रितसर प्राधिकृत केलेली अथवा नेमलेली व्यक्ती, या अधिनियमान्वये किंवा या अधिनियमान्वये केलेल्या कोणत्याही नियमान्वये अधिकार प्रदान केलेल्या व्यक्तीने, दृश्यमान प्राधिकारान्वये काढलेल्या कोणत्याही आदेशाची किंवा निदेशाची सद्‌भावपूर्वक अंमलबजवणी करण्यास वर सांगितल्याप्रमाणे उत्तरदायी असणार नाही.

---

१ मुंबई विकेंद्रीकरण अधिनियम १९१५ (१९१५ चा मुंबई ३) अन्वये "सरकारच्या मंजुरीने" हे शब्द वगळण्यात आले.

२ जिल्हाधिकाऱ्याने अधिकारांचे प्रत्यायोजन करण्यास मंजुरी देणाऱ्या अधिसूचनेसाठी मुंबई स्थानिक नियम व आदेश पहा ; आणि या अधिनियमाच्या विवक्षित कलमांखाली सहायक व उप-जिल्हाधिकाऱ्यांना अधिकार प्रत्यायोजित करण्याच्या अधिसुचनेसाठी मुंबई सरकार राजपत्र, १९०२, भाग एक, पृ. ११५३ (इंग्रजी) पहा.

**परिशिष्ट**

(कलम ३ पहा)

| अधिनियमितीचा क्रमांक व वर्ष<br>१ | विषय किंवा नाव<br>२ | निरसनाची व्याप्ती<br>३ |
|---|---|---|
| सन १८६७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७ | मुंबई जिल्हा पोलीस अधिनियम, १८६७ | कलमे ३३ व ३४. |
| सन १८६७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ८ | मुंबई ग्राम पोलीस अधिनियम, १८६७ | १६ व्या कलमातील खंड २, ३ व ४ यातील "कोणत्याही सार्वजनिक रस्त्यात किंवा मार्गात किंवा रहदारीच्या ठिकाणी मलमूत्र करून घाण करील किंवा" हे शब्द आणि खंड ५. |

एच ८०७-५,१६० पु.-१.२०११४

शासकीय मुद्रणालय, कोल्हापूर.

## महाराष्ट्र शासनाची प्रकाशने मिळण्याची ठिकाणे

- **संचालक**
  शासन मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालय,
  महाराष्ट्र राज्य
  (प्रकाशन शाखा) नेताजी सुभाष मार्ग, मुंबई-४०० ००४.
  दूरध्वनी : (०२२) २३६३२६९३ व ३६३०६९५

- **व्यवस्थापक**
  शासकीय फोटोझिंको मुद्रणालय व ग्रंथागार
  फोटोझिंको मुद्रणालय आवार, जी. पी. ओ. नजीक,
  पुणे-४११ ००१
  दूरध्वनी : (०२०) २६१२५८०८

- **व्यवस्थापक**
  शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार,
  सिव्हील लाईन्स, नागपूर-४४० ००१
  दूरध्वनी : (०७१२) २५६२६१५

- **सहा. संचालक**
  शासकीय लेखनसामग्री भांडार व ग्रंथागार, पैठण रोड,
  औरंगाबाद-४३१ ००१
  दूरध्वनी : (०२४०) २३३१५२५

- **व्यवस्थापक**
  शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार,
  ताराबाई पार्क, कोल्हापूर-४१६ ००३
  दूरध्वनी : (०२३१) २६५०४०२

आणि

## महाराष्ट्र शासनाच्या प्रकाशनाचे अधिकृत विक्रेते